Gomantak
Ed tion : Panaji
Date June 27, 2007.
Page No.: 2

# गोव्यात आरोग्य पर्यटनास मोठा वाव : डॉ. थॉमस

टीम। TODAY। पणजी।

गोव्यात आरोग्य पर्यटन क्षेत्र विकास होण्यास मोठा वाव आहे. सीआयआय, फिक्की आणि गोवा पर्यटन विकास महामंडळाच्या ते लक्षात आणून दिल्याची माहिती डॉ. मोहन थॉमस यांनी दिली.

पेशाने कॉस्मेटिक सर्जन असलेले डॉ. थॉमस गेली तीन वर्षे गोव्यात येतात. यावेळी सुरवातीला स्थानिक रुग्णांपेक्षा विदेशी रुग्णांचेच प्रमाण अधिक होते. व्हिंटेज रुग्णालयात ते प्रामुख्याने शस्त्रक्रिया करतात. सुडौल बांध्याबाबत गोमंतकीयही आग्रही होऊ लागल्याने आता विदेशीइतकेच स्थानिक रुग्णही आपल्याकडे येतात असे ते म्हणाले. गेल्या वर्षी त्यांनी दीड हजार जणांवर उपचार केले आहेत.

ते म्हणाले, आज विदेशी रुग्ण चेन्नईत उपचारासाठी येतात. दिल्लीतील विषम तापमान आणि मुंबईतील काँक्रिटीकरण लक्षात घेता गोव्याला निसर्गाने वरदहस्त दिल्याने येथे या क्षेत्राच्या विकासाला मोठा वाव आहे. त्याबाबत सर्व संबंधितांशी मी बोललो असून लवकरच ते क्षेत्र विकसित होईल याबाबत आशावादी आहे.

कॉस्मेटिक सर्जरी ही पूर्वी श्रीमंतांचीच चैन समजली जायची पण आता ती मध्यमवर्गीयांच्याही आटोक्यात आल्याचे सांगून ते म्हणाले, युवा वर्ग नाकाविषयी अधिक जागरूक असल्याचे दिसते. त्यामुळे नाकाचा आकार बदलण्याच्या शस्त्रक्रिया जास्त होतात.लठ्ठपणा कमी करण्यासाठीही कॉस्मेटिक सर्जरीचा उपयोग होतो, केसांचे पुनर्रोपणही याच मार्गाने करता येते.